# पोलीस स्टेशन
# बुलढाणा (श),बुलढाणा (ग्रा)

पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे दिनांक 18/01/25 रोजी 11/20 ते 12/50 वा. पावे तो उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सुधीर पाटील साहेब यांचे अध्यक्षतेखाली बुलढाणा शहर येथे भारतीय न्याय संहिता 2023, भारतीय साक्ष अधिनियम 2023 व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 हे तीन नवीन कायदे भारतीय संसदेने पारित केलेले असून दिनांक 01/07/24 पासून उक्त नमूद कायद्यांची अंमलबजावणी असल्याने कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व जनसामान्यांना कायद्याची ओळख करून देण्यात यावी याकरिता पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे बुलढाणा शहर व बुलढाणा ग्रामीण पोलीस स्टेशन यांचेकडुन संयुक्तीकरीत्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेकरिता प्रामुख्याने सरकारी वकील श्रीमती कस्तुरे मॅडम, एडवोकेट श्री सवडतकर, एडवोकेट श्री राठोड यांनी उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन मार्गदर्शन केले. नवीन कायद्याबाबत सविस्तर माहिती समजावून सांगण्यात आली. कार्यशाळे करिता प्रामुख्याने चेंबर ऑफ कॉमर्स चे प्रतिनिधी, वकील,प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, महाविद्यालयीन प्राचार्य उपस्थित होते.


बुलडाणा जिल्हा पोलीस दल अंतर्गत
भारतीय न्याय संहिता २०२३
भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३
भारतीय साक्ष अधिनियम २०२३
ह्या तीन कायद्याच्या प्रसार व
प्रसिद्धीसाठी कार्यशाळा




OPPO F19
2025.01.21 12:12


OPPO F19
2025.01.21 12:12